॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) : भारत सरकार, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय, नवी दिल्ली आणि चौधरी देवीलाल विद्यापीठ शिरसा, हरियाणा यांच्या संयुक्त विद्यमानाने, शिरसा येथे दि. ०६ ते १२ मार्च, २०२६ राष्ट्रीय एकता शिबिर संपन्न झाले.

या शिबिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ सहभागी झाला. संघ व्यवस्थापक प्रा. विजयकुमार वाघमारे यांच्या सह स्वयंसेवक ऋषिकेश पारधी, धिरज पवार, रोहित गिरासे, मंगेश शिंपी, चेतन वसावे, प्रांजल मराठे, तेजस्विनी गोराने, रिदम जावरे, वैष्णवी पाटील, शिल्पा पाडवी यांनी सहभाग नोंदवला.

देशभरातून १६ राज्यातून राष्ट्रीय सेवा योजनाचे २०० स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी सहभागी झालेले होते. महाराष्ट्र राज्यातून सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य गीत, वारी, लेझीम नृत्य, सिबली आदिवासी नृत्य, लावणी, लोकगीत, शिव भीम गीत यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

राष्ट्रीय शिबिरात सहभागी संघाला विद्यापीठाचे कुलगुरू प्रा व्ही. एल. माहेश्वरी, प्र - कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्यासह एन एस एस चे संचालक व्ही एम रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) :  महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने चिखलदरा येथील "वन प्रशिक्षण संस्थेत" आयोजित राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर २०२५ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत 'सर्वोत्कृष्ट विद्यापीठ' हा मानाचा पुरस्कार पटकावला.

दहा दिवस चाललेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांनी झिप लाईनिंग, स्काय सायकलिंग, ट्रेकिंग, वॉल क्लायंबिंग, रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग यांसारख्या साहसी उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही उत्कृष्ट सादरीकरण केले.

या यशाबद्दल कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. प्रा. व्ही एम रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी राजेश्वरसिंग पाडवी यांच्या नेतृत्वाखाली संघाने ही कामगिरी केली. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून दिनेश राठोड, यश साकोरे, सुजीत गावित, अर्जुन भील, योगिता सरोदे, विद्या सोनवणे आणि कविता नवसारे यांनी सहभाग नोंदविला.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) : आजच्या डिजीटल युगात विद्यार्थ्यांचे सोशल मीडियाकडे वाढते आकर्षण आणि वाढता स्क्रीन टाईम याचा त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा योग्य आणि मर्यादित वापर करताना प्रभावी स्टडी टेक्निक्स अवलंबणे तसेच स्क्रीन टाईमचे नियोजन करणे आवश्यक आहे असे मत कुलसचिव डॉ विनोद पाटील यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत सोशल मीडिया आणि स्टडी टेक्निक्स, सोशल मीडिया आणि स्क्रीन टाईम मॅनेजमेन्ट या विषयावर दि. 13 मार्च रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मंचावर कला व मानवविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.राम भावसार, डॉ. गोपी सोरडे, डॉ. तुषार देशपांडे, डॉ. सोमनाथ वडनेरे उपस्थित होते. पुढे बोलतांना कुलसचिव डॉ.विनोद पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डिजिटल साधनांचा सकारात्मक उपयोग करून स्वत च्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून प्रा. राम भावसार यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धेकांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक अमोल पाटील (माध्यमशास्त्र प्रशाळा) याने पटकविला. द्वितीय क्रमांक वैभव भोंबे (माध्यमशास्त्र प्रशाळा) तृतीय क्रमांक स्वप्रिल जाधव (भाषा अभ्यास प्रशाळा संशोधन केंद्र) तर उत्तेजनार्थ प्रथम प्रांजली जोशी (भाषा अभ्यास प्रशाळा संशोधन केंद्र) द्वितीय अपेक्षा घोडेस्वार (सामाजिकशास्त्रे प्रशाळा) यांनी पटकाविला स्पर्धेचे परीक्षण डॉ. तुषार देशपांडे, डॉ सोमनाथ वडनेरे यांनी केले. प्रास्ताविकात प्रा. राम भावसार वक्तृत्व स्पर्धेची भूमिका विशद केली. सुत्रसंचलन रोहित देशमुख तर आभार डॉ.गोपी सोरडे, प्रा.प्रकाश सपकाळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी रंजना चौधरी, प्रल्हाद लोहार, मंगेश बाविसाणे, विशाखा कोळी यांनी परिश्रम घेतले

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १३ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता